RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 April 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 April, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : दहावा | एप्रिल २०१६

सावन सावन पई ढुड़ेंदी (भजन) 4

गुरू प्रिय भाई मंझ (गुरू प्रेमाची कथा) 5

परमात्मा (सत्संग) 11

निंदक (संदेश) 23

प्रश्नोत्तरे 27

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

सावन सावन पई ढुडेंदी

परमसंत अजायब सिंहजींनी महाराज सावन सिंहजींच्या आठवणीत रचलेले एक विरहरूपी भजन



सावन–सावन पई ढुडेंदी, सावन दिल विच वसदा,
सावन मेरा दिलबर जानी, हर साह दे विच वसदा, (२)

१. कदी उदासी छा जांदी है, कदे पैर ना धरती लगदा
रमज सावन दी समझ ना आवे, पता लगे ना रग दा, (२)

२. हौंके हावियां विच जिंद सुक्की, ते होई फिरां सुदाई,
दिल दा महरम किते ना दिस्सया, जद झात अंदर मैं पाई,(२)

३. दर्श प्यासी वे मैं सावन, इक वारी दर्श दिखादे,
तूं ते मैं इक्क हो जाईए, अजायव दी प्यास बुझा दे, (२)

गुरू प्रिय भाई मंझ

हुज़ूर बाबा सावन सिंहजी महाराजांच्या मुखकमलातून वर्णिलेली
एक गुरू प्रेमाची कथा

भाई मंझ केवळ श्रीमंतच नव्हे तर गावाचा प्रमुख देखील होता. तो सखी सरवर नामक पीरखान्याची पूजा करीत असे. एके दिवशी तो गुरु अर्जुनदेवजी महाराजांच्या सत्संगात गेला असता त्या सत्संगाचा त्याच्यावर खूप प्रभाव पडला. त्याने गुरुसाहेबांना नामदान देण्याची विनंती केली.

गुरु अर्जुनदेवजी महाराजांनी भाई मंझला विचारले,''आता तू कोणाची पूजा करतोस?''त्यावर भाई मंझने उत्तर दिले,''महाराज! मी सखी सरवरचा सेवक आहे.'' गुरुसाहेब म्हणाले,''तू घरी जा आणि घरात पूजा करण्यासाठी जो पिरखाना बनविला आहेस, तो पाडून टाक. त्यानंतर मी तुला नामदान देईन.'' भाई मंझ घाईघाईने धावत घरी गेला आणि त्याने पिरखान्याची वीट अन् वीट तोडून टाकली. तेथे बरेच लोक जमा झाले. भाई मंझला ताकीद देत ते म्हणाले की हा पिरखाना तोडण्याची तुला खूप मोठी किंमत चुकती करावी लागेल. तुझ्यावर कोणतीही आपत्ती कोसळली, तरी आम्ही तुला कसलीही मदत करणार नाही. अत्यंत हिंमतीने भाई मंझ म्हणाला, ''मी पिरखाना पाडलेला आहे. त्यामुळे होणाऱ्या कोणत्याही परिणामास तोंड देण्याची माझी तयारी आहे.''

भाई मंझ जेव्हा गुरु अर्जुनदेवजींकडे परतला तेव्हा नामदानास पात्र ठरवून त्यास गुरु अर्जुनदेवजींनी नाम दिले. परंतु त्याच्या नशिबात अजून अनेक परीक्षा देण्याचे बाकी होते. काही काळाने त्याचा घोडा मेला. नंतर त्याचे बैल मेले. चोरांनी त्याचे सामान चोरून नेले. आता लोकं त्याची थट्टा करू लागले व म्हणू लागले की तू सखी सरवरचा अपमान केल्यामुळेच तुला हे सर्व भोगावे लागत आहे म्हणून तू घरात पुन्हा पीरखाना बनव.

या गोष्टींमुळे भाई मंझ थोडा देखील अस्वस्थ झाला नाही. तो म्हणाला ''जे काही घडत आहे त्याची मला किंचितदेखील चिंता नाही. माझे सतगुरु सर्वकाही जाणतात. माझे भले कशात आहे हे यांना माहीत आहे. त्यामुळे कोणतीही शक्ती माझा सतगुरुंवरील विश्वास डळमळीत करू शकत नाही.''

त्यानंतर त्याच्यावर एका मागून एक संकटे कोसळली. काही काळातच भाई मंझ कंगाल झाला, अनेकांकडून उधारी घेऊन तो त्यांचा कर्जबाजारी झाला. त्या लोकांनी भाई मंझकडून त्यांनी उधार दिलेले पैसे मागितले व म्हटले,''ताबडतोब आमचे पैसे परत कर नाहीतर गाव सोडून जा.'' त्यावेळी त्यांच्या अनेक मित्रांनी त्यास सांगितले,''तू जर पुन्हा पीरखाना बनविलास तर नक्कीच सर्व काही ठिक-ठाक होईल.''

भाई मंझ स्वत:च्या निश्चयावर ठाम राहिला. त्याने गाव सोडून जाणे पत्करले. उरले-सुरले सामान बांधून तो आपल्या पत्नी व मुली समेत दुसऱ्या गावी गेला. भाई मंझ श्रीमंत असल्याने त्यास व्यापार कसा करावा हे देखील शिकण्याची पूर्वी गरज भासली नव्हती. परंतु आता त्यास उदर-निर्वाहासाठी थोडे फार पैसे कमविणे खूप गरजेचे होते. तेव्हा तो गवत कापून त्याच्या विक्रीतून पैसे कमावू लागला.

अशा तऱ्हेने अनेक महिने निघून गेले. गुरु साहेबांनी एका सेवकाच्या हस्ते भाई मंझला एक पत्र पाठविले. गुरु साहेबांनी त्या सेवकास सांगितले की भाई मंझला पत्र देण्यापूर्वी त्याच्याकडून वीस रुपये देणगी म्हणून घे आणि मगच त्यास हे पत्र दे.

गुरु साहेबांचे पत्र पाहून भाई मंझला अतिशय आनंद झाला. परंतु देणगी देण्यासाठी त्याच्याकडे वीस रुपये नव्हते. यावर त्याने आपल्या पत्नीचा सल्ला विचारला असता ती म्हणाली, ''मी माझे आणि मुलीचे दागिने गहाण ठेवण्यासाठी सोनाराकडे नेते आणि पहाते की तो त्यांचे किती पैसे देतो?''

सोनाराने त्या दागिन्यांचे वीस रुपयेच दिले. त्या वीस रुपयांची देणगी देऊन भाई मंझने गुरु साहेबांनी पाठविलेले पत्र घेतले. त्या पत्राचे चुंबन घेऊन ते आपल्या नेत्रांना लावले, ते पत्र आपल्या छातीशी धरले. त्याच्या आनंदाची सीमाच राहिली नाही.

दोन वर्षांनंतर गुरु साहेबांनी भाई मंझला दुसरे पत्र पाठविले. ते पत्र घेण्यासाठी आता भाई मंझला पंचवीस रुपयांची देणगी द्यावी लागणार होती. यावेळीदेखील भाई मंझकडे पैसे नव्हते. त्यास आठवले की गावाच्या प्रमुखाने त्याच्या मुलाच्या विवाहासाठी आपल्या मुलीस मागणी घातली होती. तो गावाचा प्रमुख भाई मंझपेक्षा खालच्या जातीचा होता. भाई मंझने आपल्या पत्नीस त्या प्रमुखाकडे पाठवून मुलीच्या लग्नाच्या बदल्यात पंचवीस रुपयांची मागणी केली. गावाच्या प्रमुखाने आनंदाने पंचवीस रुपये दिले. जे रुपये देऊन भाई मंझने गुरु साहेबांनी पाठविलेले पत्र हस्तगत केले.

गुरु साहेब भाई मंझची आणखी परीक्षा घेऊ इच्छित होते. अखेरीस त्यांनी एका सेवकास सांगितले, ''भाई मंझकडे जा आणि त्यास माझ्या दरबारामध्ये हजर होण्यास सांगा.'' भाई मंझ घाई–घाईत त्याच्या परमप्रिय सतगुरुंच्या दरबारात हजर झाला. तेथे त्याची पत्नी आणि मुलगी लंगरमध्ये भांडी स्वच्छ करण्याची, लाकडे तोडण्याची सेवा करू लागल्या.

काही दिवसांनी गुरु साहेबांनी सेवकांना विचारले,''भाई मंझ भोजन कुठे करतो?'' सेवकांनी सांगितले, ''आम्हां सर्वांप्रमाणे तो देखील लंगरमध्ये भोजन करतो.''गुरु साहेब म्हणाले,''मग तो सेवा नाही, मजुरी करीत आहे. मग त्याने सेवेच्या बदल्यात इतर कसलीही अपेक्षा ठेवता कामा नये.''

भाई मंझने आपल्या पत्नीद्वारे जेव्हा गुरूसाहेबांचे हे उद्गार ऐकले तेव्हा तो पत्नीस म्हणाला,''मी माझ्या सेवेच्या बदल्यामध्ये सतगुरुंकडून कसलीच अपेक्षा करीत नाही. सतगुरुंनी मला अनमोल असे नामदान दिले आहे. आपण आपल्या भोजनाची व्यवस्था, इतर कोणत्यातरी मार्गाने करूया.''

त्या दिवसापासून भाई मंझ रात्रीच्या वेळी लाकूड तोडीसाठी जंगलामध्ये जाऊ लागला आणि ती लाकडे विकून जेवणासाठी साधन–सामुग्री विकत घेऊ लागला. काही लाकडे गुरू साहेबांच्या लंगरसाठीदेखील आणू लागला. भाई मंझ व त्याचे कुटुंब दिवसा पूर्वीप्रमाणेच लंगरमध्ये सेवा करीत राहीले. काही आठवड्यानंतर एके रात्री भाई मंझ लाकूड तोडण्यासाठी जंगलात गेला असता खूप मोठे वादळ आले. भाई मंझने अतिशय धैर्याने लाकडांची मोळी डोक्यावर घेतली आणि वादळास तोंड देऊन चालू लागला. परंतु वारा इतका वेगाने वाहत होता की भाई मंझ एका विहिरीमध्ये पडला. मौल्यवान लाकडांची मोळी त्याच्या डोक्यावर होती. जी काही घटना घडली त्याबद्दल गुरु साहेबांना अगोदरपासूनच कल्पना होती.

गुरु साहेबांनी काही सेवकांना गोळा करून त्यांना सांगितले की लाकडी तराफा आणि रस्सी घेऊन माझ्या मागे जंगलात चला. जंगलामधील त्या विहिरीजवळ पोहचल्यावर गुरु साहेब म्हणाले की या विहिरीमध्ये भाई मंझ आहे. त्यास हाक देऊन सांगा की आम्ही लाकडी तराफा रस्सीला बांधून विहिरीमध्ये सोडत आहोत. त्याने त्या तराफ्यावर चढावे, मग तो आपण वरती खेचून घेऊ. सेवकांनी त्याप्रमाणे केले.

त्यावेळी सेवकांनी आपल्या स्वत:च्या वाक्यांची भर घालीत भाई मंझला म्हटले, ''हे बघ बंधु! तुमची किती दुर्दशा झालेली आहे. तुमची ही अवस्था गुरु साहेबांमुळेच झालेली आहे. जे गुरु तुमच्याबरोबर अशा प्रकारची वागणूक करतात, त्या गुरुंना तुम्ही विसरून का जात नाही?'' भाई मंझ म्हणाला, ''मी माझ्या परमप्रिय सतगुरुंना विसरणे कदापि शक्य नाही. तुम्ही कृतघ्न लोकांनी माझ्यासमोर सतगुरुंप्रती असे निरादराचे शब्द उच्चारू नयेत. असे लज्जास्पद शब्द ऐकून मला खूपच दु:ख होते. सर्वप्रथम तुम्ही ही लाकडांची मोळी विहिरीबाहेर काढावी, कारण ही सतगुरुंच्या लंगरसाठी आहे. ही ओली होऊ नये अशी माझी इच्छा आहे.



प्रथम लाकडांची मोळी बाहेर काढली गेली, नंतर भाई मंझला ओढून विहिरी बाहेर काढले गेले. भाई मंझ जेव्हा सतगुरुंसमोर आला तेव्हा गुरु साहेब म्हणाले,''बंधुराज! तुम्ही इतक्या कठोर परीक्षांना सामोरे गेलात. अतिशय धैर्य, विश्वास आणि सतगुरुंवरील भक्तीच्या सहाय्याने त्यांना तोंड दिले. याच्या बदल्यात तुम्ही त्रिलोकीच्या राज्याची जरी मागणी केली, तरी बक्षिस स्वरूपामध्ये ते देखील मी देऊ शकतो. हे बक्षिस देण्यात मला आनंद होईल.'' भाई मंझ म्हणाला, ''हे परमप्रिय सतगुरु! हे कलियुग आहे. या कलियुगात अशा प्रकारच्या कठोर परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याची सेवकांमध्ये शक्ती नाही. म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की यापुढे सेवकांची अशा प्रकारे परीक्षा घेतल्या जाऊ नयेत.

हे ऐकून गुरु अर्जुनदेवजी अतिशय प्रसन्न झाले. ते भाई मंझला एखादे मोठे बक्षिस देऊ इच्छित होते. ते म्हणाले, तू माझ्याकडून कोणतेही वरदान मागून घे. ते वरदान देताना मला अतिशय आनंद होईल. भाई मंझ गुरु साहेबांसमोर गुडघे टेकून नतमस्तक झाला. त्यांच्या नेत्रांमधून अश्रुधारा वाहू लागल्या. तो म्हणाला, ''हे सतगुरु मी कोणत्या वरदानाची कामना करू? मला केवळ तुम्हीच प्रिय असून मला इतर कोणत्याही गोष्टीत रूची नाही.''

मंझच्या अंत:करणातून निघालेले हे शब्द ऐकून गुरु साहेबांनी भाई मंझला मिठी मारली आणि म्हणाले:

मन्झ प्यारा गुरु को, गुरु मन्झ प्यारा।
मन्झ गुरु का बोहिथा, जग लंघणहारा।।

***



परमात्मा

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू नानकदेवजी व गुरू अंगददेवजी महाराजांची वाणी, संतबानी आश्रम १६ पी एस राजस्थान : २९ डिसेंबर १९८८

जेव्हा धर्माचे पतन होऊ लागते तेव्हा जग परमात्म्याची भक्ती सोडून कर्मकांडे करण्यात मग्न होतात, आपापसात क्रोध व मतभेदाचे वाद–विवाद निर्माण होतात.पंडित, मुल्ला, भाई व पादरी सर्व एकाच श्रेणीचे असतात. ते स्वत:ही बहिर्मुखी असतात व सर्व जनतेस देखील बहिर्मुखी बनवितात. ते स्वत: देखील पाण्यात रावी घुसळीत असतात व इतरांसही त्यातच गुंतवितात.

आपणांस संत–महात्म्यांच्या लेखण्या वाचून लक्षात येते की त्यांनी लिहीलेली ग्रंथ–पुस्तके आपणांस अंतर्यात जाण्याचा सल्ला देतात की परमात्मा आपल्या अंतर्यात आहे व आपणांस तो अंतर्यात जाऊनच प्राप्त होऊ शकेल. सर्वप्रथम आपण एका अशा संत–महात्मांच्या चरणी जा जे स्वत: अंतर्यात जात असावेत. तेच आपणांस अंतर्यात घेऊन जातील. परंतु सांगताना खेद वाटतो की कोणीही सत्य ऐकून घेण्यासाठी तयार नाही.

ज्या महात्म्यांच्या शिकवणीनुसार चालण्याचा हे धार्मिक पुढारी दावा करतात, त्या महात्म्यांनी खूप कठीण परिश्रम घेतले, आपल्या मनाशी खूप संघर्ष केला, देह सोडून ब्रह्मांडापर्यंत पोहोचले, परमात्म्यास प्राप्त केले. त्याविरुद्ध हे धार्मिक पुढारी ऐशोआरामात राहून इंद्रियभोगांचे गुलाम बनले आहेत. यांना परमात्मा किंवा सच्चखंडात जरादेखील स्वारस्य नाही.

प्रियजनहो, परमात्म्यापासून वियोग होऊन आपण जन्म–जन्मांतरापासून बाह्यजगात भटकत आहोत. आपले अध्यापक आणि पालक देखील आपल्या बहिर्मुखी होण्यात हातभार लावतात, बाह्यजगातील रीतिरिवाज करण्यासाठी आपणांस प्रोत्साहन देतात. कबीर साहेब सांगतात, ''आपले भाग्य थोर असले तरच आपली भेट एखाद्या नामाची साधना करणाऱ्या महात्म्यांशी

होते. असे उच्च कर्म खूप थोडेथोडके आत्माच आपल्या नशीबी लिहून आणतात, ज्यांच्या भाग्यात गुरूंची भेट लिहिलेली असते. केवळ असे गुरूच अण्तर्यात जाऊन परमात्म्यास प्राप्त करण्याचे प्रोत्साहन देतात.''

आपण विचार करून पहा! आत्मा कधीपासून संसारात भटकत आहे, त्यास किती युगे झालेली आहेत व त्याने किती जन्म घेतले आहेत याची कल्पना नाही. अशा बहिर्मुखी आत्म्यास अंतर्मुखी करणे एखाद्या अध्यात्मिक महात्म्यासाठी देखील सोपे काम नसते, म्हणूनच त्यांना वारंवार सत्संगात समजावावे लागते व ध्यान–अभ्यासाचा सराव करवून घ्यावा लागतो.

आपणांस बालपणापासूनच बहिर्मुखी राहण्याची सवय लागलेली आहे. आपला कल बाह्यजगाकडे असतो. महात्मा जन्मल्यापासूनच अंतर्मुखी होण्याचे साधन अंगिकारतात. त्यांची भावना सदैव अंतर्मुखी असते. आपण महात्म्यांचे जीवनचरित्र वाचतो की महात्मांना बालपणापासूनच डोळे बंद करून बसण्याची आवड असते व त्यांनी आपले जीवन परमात्म्याचा शोध घेण्यात व्यतीत केलेले असते. एखाद्या सांसारिक मनुष्याच्या व महात्म्यांच्या जीवनचरित्रात हजारो–लाखो कोसांचा फरक असतो.

आपल्या समोर रोजच्याप्रमाणे *'सारंग की वार'* ग्रंथातील वाणी सादर केली जात आहे. प्रथम गुरू अंगददेवजी महाराजांची व नंतर गुरू नानकदेवजी महाराजांची वाणी घेतली जात आहे. गुरू अंगददेवजी महाराज सांगतात की जेव्हा सर्वश्रेष्ठ परामात्म्याकडे जेव्हा आपल्यासारखे वंजारी जीव जातात तेव्हा परमात्मा आपणांस श्वासांची पुंजी देऊन सांगतो की तुम्ही श्वासांचा सदुपयोग करून चांगले काम करा.

परमात्मा आपणांस सदाचारी बनण्यासाठी संसारात पाठवितो. परमात्मा म्हणतो की तुम्ही 'शब्द–नामाची' साधना करा. मी तुम्हांस ही संधी देतो. जर तुम्ही या जन्मात 'शब्द–नामाची' साधना केलीत तर मी तुम्हांस आपल्या घरी परतल्यावर शाबासकी देईन. माझा आदेश व माझे प्रेम सदैव

तुमच्या सोबत आहे. आपण तेथून जी पुंजी घेऊन येतो काही आत्मा त्या पुंजीमध्ये वाढ करून घेतात व आपल्या पित्या परमात्म्यास प्रसन्न करतात. जे या विषय-विकारांच्या संसारात येऊन भ्रमतात व मनेंद्रियांचे गुलाम बनतात ते परमात्म्याने दिलेली श्वासांची पुंजी व्यर्थ गमावून निघून जातात.

साह चले वणजारया लिखया देवे नाल।
लिखे ऊपर हुक्म होय लईऐ वस्तु समाल।।

गुरु अंगददेवजी महाराज सांगतात,''जेव्हा आपण त्या परमात्म्याच्या द्वारातून संसारात निघतो तेव्हा तो आपल्या हाती व मस्तकी लिहून देतो की तुला कशाप्रकारची सुखं-दुखं व श्रीमंती-गरीबी मिळेल, तुझा मृत्यु कुठे होईल? मी तुला बेलगाम सोडून देत नसून तू आपल्या मन-बुद्धीच्या बळावर हवा तेवढा भटक परंतु जेव्हा मी तुझी दोरी खेचेन तेव्हा तुझ्या संसारिक गोष्टींचे बळ कोणत्याही कामी येणार नाही.''

जैसी कलम भिड़ी है मस्तक तैसी लीड़े पार।

जर परमात्मा आपल्या नेक कर्मांचे बक्षिस म्हणून आपणांस सुख देतो, एखादी सत्ता हाती येण्याची संधी देतो, त्यावेळी आपण जर समंजस असलो तर आपण परमात्म्याची भक्ती करतो,परमात्म्याशी समरस रहातो व म्हणतो की हे परमात्मा ही सर्व तुझीच कृपा आहे. परमात्म्याने दिलेल्या वस्तूचा खूप सांभाळून व योग्य वापर करतो. सत्यापासून नजर फिरवणे हे काही हुषारीचे कार्य नव्हे. कबुतर मांजररुपी मृत्युस पाहून आपले डोळे बंद करते परंतु काही क्षणातच ते स्वत:स त्या मांजराच्या जबड्यात सापडलेले पहाते.

वस्तु लई वणजारई वखर बधा पाए।
केई लाहा ले चले ईक चले मूल गँवाए।।

कित्येक लोक परमात्म्याकडून मनुष्य देहरूपी सौदा घेऊन या संसारात आले. अनेकांनी या देहात बसून नामाचा व्यापार केला जो आपण चौऱ्याऐंशी

लक्ष योनींमध्ये बसून करू शकत नव्हतो. कित्येक या मनुष्यदेहात बसून लाभ घेऊन जातात आणि काही पुन्हा मनुष्यजन्माचे अधिकारी न रहाता आपली मुळपुंजी गमावून निघून जातात. गुरूसाहेब सांगतात:

पेड़ मंडा हो कटिए डाल सुखिन्दे।

ज्या वृक्षाची मुळे कापली जातात त्याच्या फांद्या सुकून जातात. तो वृक्ष हिरवागार कसा होऊ शकतो? ज्याने आपल्या जीवनरूपी वृक्षाची मुळे कापली असतील तो मनुष्यजन्माचा अधिकारी रहात नाही तर मग तो नामाची साधना कशी करू शकेल? त्यास पुन्हा केव्हा संधी मिळेल? गुरू नानकदेवजी महाराज म्हणतात:

अबके छुटके ठौर न ठाव।

थोड़ा किने न मंगयो किस कहिए शाबास।
नदर तिन्हां को नानका जे साबत लाए रास।।

गुरू नानकदेवजी महाराज म्हणतात की आजपर्यंत कोणीही संसारिक वस्तू कमी मागितल्या नाहीत. ज्यास एक लाख मिळतात तो दोन लाखांची इच्छा व्यक्त करतो व जेव्हा दोन लाख मिळतात तेव्हा चार लाखांची इच्छा करतो. जो एका जिल्ह्याचा मालक बनतो त्यासा वाटते की मी सर्व प्रांताचा मालक बनावे व जेव्हा तो प्रांताचा मालक बनतो तेव्हा त्यास वाटते की मी संपूर्ण देशाचा मालक बनावे. संपूर्ण देशाचा मालक बनूनही त्यास तृप्ती लाभत नाही, त्यास वाटते की मी शेजारच्या देशावरही कब्जा करावा.

आपणांस माहित आहे की हिटलर आणि शाह सिकंदर सारख्या लोकांनी किती स्वप्ने पाहिली की आपण सर्व संसाराचे विजेता म्हणून सिद्ध व्हावे.संत आपणांस स्वस्थ बसून रहाण्यास सांगत नाहीत. ते आपणांस सांगतात मुल पुढे वाटचाल करण्यासाठी हात–पाय मारते. पुरुषार्थ करणे मनुष्याचे कर्तव्य असते. आपणांस जे मिळणार आहे ते आपल्या जन्माआधीपासूनच निश्चित

केलेले असते, ते आपणांस अवश्य मिळेल. जर आपण जास्त वस्तु प्राप्त करण्यासाठी आपल्या मौल्यवान तत्वांचा त्याग करतो व लोकांना ठगतो व फसवितो. जेव्हा आपण परमात्म्याकडे परततो तेव्हा परमात्मा कोणास शाबासकी देईल. गुरूमुखांना सोडून असा एकही नजरेस पडत नाही जो उपाशी राहून भक्ती करतो व परमात्म्याचे आभार मानतो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की,''मनुष्याच्या इच्छाच मनुष्यास कंगाल बनवून ठेवतात. ज्याच्या अंतरात संसारिक गोष्टी भरलेल्या आहेत व जो त्या वस्तू प्राप्त करून तृप्त होत नाही त्यापेक्षा जास्त कंगाल कोण आहे?''

कबीर साहेब पहिले संत आहेत जे कधी मनुष्यजन्माखाली गेले नाहीत. आपण आपल्या मर्जीनुसार जगात येत राहिलात. आपण विचार करून पहा! ज्यांच्याकडे इतकी शक्ती आहे, जे स्वत:च्या मर्जीनुसार जन्म घेऊ शकतात ते एखाद्या राजाच्या घरी देखील जन्म घेऊ शकत होते. तरीदेखील त्यांनी एका गरीब कुटुंबात जन्म घेतला. हिंदुस्थानात वीणकर लोक गरीब समजले जातात कारण ते लोकांसाठी सुत कातून वीणकाम करून आपला उदरनिर्वाह करतात. आपण असा जन्म घेऊन म्हणतात:

जिसको कछु न चाहिए सोई शहन्शाह।

मोठ–मोठे राजा–महाराजा कबीर साहेबांचे सेवक होते. ते त्यांचा निवास प्रशस्त महालांमध्ये करू शकत होते, त्यांच्या रहाण्यासाठी सुखसोयींचे घर बांधू शकत होते. परंतु आपण विणकाम करण्यालाच राजेशाही समजली. आपण विश्वेश्वर असूनही आपले काम खालच्या स्थराचे मानले नाही. आपण आम्हांस उपदेश दिला की प्रियजनहो, आपण जिथेही जाऊन जन्म घेता तेथे आपल्या नशीबी जे काही लिहिलेले आहे ते आपणांस जरूर मिळेल. ते कधीही जास्त–कमी होत नाही.

शाह बल्ख बुखारा चांगल्या राजमहालात रहात असे, त्याच्या अनेक लष्करी सेना होत्या. त्याचे राज्य अनेक प्रांतात होते. जेव्हा बल्ख बुखाराने

प्रभू–परमात्म्याच्या नजरेस ओळखले तेव्हा तो अत्यंत गरीब घराण्यातील कबीर साहेबांचा चाकर बनला व विनामुल्य त्यांच्या घरी वीणकाम करू लागला. कबीर साहेब म्हणाले,''तू बल्ख बुखारा प्रांताचा बादशहा आहेस व मी तर एक गरीब वीणकर आहे. तुझा व माझा निर्वाह कसा होऊ शकेल?'' बल्ख बुखारा म्हणाला,''मी बादशहा बनून नव्हे तर एक भीकारी बनून आपल्या द्वारी आलेलो आहे, आपण मला जे काही सुके–कोरडे अन्न द्याल मी ते खाऊन आपला निर्वाह करेन.'' जेव्हा बल्ख बुखारावर परमात्म्याच्या कृपेची नजर पडली तेव्हा त्याने ती नजर ओळखली होती.

बल्ख बुखाराच्या मुलाने खूप चांगली मेजवानी दिली होती. त्या मेजवानीत अनेक राजकारभारी लोक देखील एकत्रित होणार होते. बल्ख बुखाराच्या मुलाच्या मनात आले की या प्रसंगी आपल्या वडिलांची उपस्थिती असणे महत्वाचे आहे. तो आपल्या वडिलांना बोलावण्यासाठी गेला. बल्ख बुखाऱ्यास वाटले की मी जर यास समजावण्याचा प्रयत्न केला तर यास समजणार नाही. म्हणून त्याने थोडासा हलवा एका आरशावर लावला त्यामुळे त्या आरशात आपल्या चेहऱ्याचे प्रतिबिंब दिसणे बंद झाले.

बल्ख बुखारा म्हणाला,''बाळा बघ, अगोदर हा आरसा किती चांगला होता, त्यावर मी चांगल्यातला चांगला हलवा लावला तरी तो अंधुक झालेला आहे. आता या आरशात आपला चेहरा दिसत नाही. याचप्रमाणे सांसारिक ऐशोआराम, चांगली पक्वान्ने स्वतःस ओळखू देत नाहीत, प्रभू–परमेश्वराची भक्ती करू देत नाहीत. मला जे सुख कबीर साहेबांचे वीणकाम करण्यात व भक्ती करण्यात मिळाले आहे ते बादशाहीत नाही.''

गुरू अंगददेवजी महाराज सांगतात परमात्म्याने आपणांस कितीही धन–पदार्थ किंवा मान–प्रतिष्ठा दिली तरी आपण आणखी मागतो. परमात्माने कोणास शाबासकी द्यावी असा कोणी नजरेस पडत नाही. केवळ गुरुमुखच परमात्म्याच्या शाबासकीचे खरे मानकरी असतात. ते दुःखात राहूनही सुख

मानतात. ज्याप्रमाणे आईचे ध्यान आपल्या मुलाकडे लागलेले असते की आपल्या बाळास कोणत्या गोष्टीची गरज आहे? ती मी पूर्ण करावी. त्याचप्रमाणे गुरुमुख परमात्म्याच्या नजरेतच असतात. परमात्म्यास माहित असते की यास कोणत्या गोष्टीची गरज आहे? याचे कोणत्या गोष्टीत हित आहे? परमात्मा त्याच गोष्टी करतो ज्या त्यास कल्याणकारक असतात.

जुड़ जुड़ विछड़े विछड़ जुड़े, जिव जिव मुए मुए जीवे।

आता गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''या जगात आपले अनेकदा एखाद्या कुटुंबाशी नाते जुडते. त्या कुटुंबात कोण बाप बनतो तर कोण पुत्र बनतो, कोण भाऊ तर कोण बहीण बनते. आपाआपल्या कर्मांनुसार त्यांचा वियोग होतो. जरी आपण पशू–पक्षी असलो तरी आपणांस मृत्यु येतो व मनुष्य असलो तरी आपणांस मृत्यु येतो. जरी आपण उच्च हुद्यावर असलो, राजा–महाराजा असलो तरीही मृत्यु येतोच. जरी आपण गरीब असलो गल्लीबोळात दारोदारी भटकत असलो तरी मृत्यु येतोच. आपण यापूर्वी किती वेळा जन्मलो व किती वेळा मेलो, किती वेळा एखाद्या कुटुंबात एकत्रित आलो व भविष्यात किती वेळा एकत्रित होणार आहोत यागोष्टींचे आपण अनुमानही लावू शकत नाही. आपण एकमेकांना ओळखूही शकत नाही.

केतयां के बाप केतयां के बेटे केते गुरू चेले हुए।

आपण आजतोवर किती लोकांचे बाप बनलो व किती लोकांना आपण बाप बनविले याचीदेखील कोणी मोजणी करू शकला नाही. यापूर्वी आपण किती वेळा गुरू बनलो आणि कितीजणांना चेले बनवून सोडून गेलो याची देखील गणना होऊ शकत नाही. गुरू व चेला यांचा संदर्भ देण्याचा उद्देश हा आहे की जर आपण परिपूर्ण गुरूंचे शिष्य असतो तर आपण भूतांप्रमाणे या जगात फेऱ्या मारत बसलो नसतो. परिपूर्ण गुरू नामाचा जप करवून पहिल्या दिवशीच आपला दोर वरच्या मंडळांमध्ये बांधतात.

पूरा सतगुरू न मिलया सुणी अधूरी सीख।
स्वांग जति का पहन कर ते घर घर मांगे भीख।।

असे गुरू बनून लोकांकडून खाऊन–पिऊन मनेंद्रियांचे गुलाम बनून राहिले. त्यांनी सेवक केवळ पैसे ऐटण्यासाठीच बनविले व त्यांचे सेवकदेखील मन–इंद्रियांचे गुलाम बनले. असे गुरू मेल्यानंतर कुठे जातील? ते त्यांच्याच सेवकांच्या घरी बैल किंवा उंट बनून त्यांच्या कर्जाची परतफेड करतील. सेवक त्यांस छडीने मारतील व त्यांवर चढून बसतील.

आमच्या राजस्थानात गुरू धारण करणे जरूरी आहे, मग भले गुरू जुगारी असो वा चोर असो. खीर व हलव्याचा नैवेद्य देऊन सोबत सव्वा रुपयांची दक्षिणा देऊन त्यांच्या पाया पडल्यास असे गुरू आपल्या घरी देखील येतील.

प्रियजनहो, येथून सत्तर–ऐंशी मैल अंतरावर तारखांवाली नावाचे गाव आहे. मी त्या गावी जात नेहमी असे. तेथे माझा एक श्रद्धाळू सेवक रहात असे. त्या सेवकाने आपल्या पत्नीला नाम घेण्यासाठी प्रेरणा दिली. त्याच्या पत्नीने त्यास म्हटले की तुझा व माझा मार्ग वेगळा आहे. तू ज्या गुरूंना धारण केलेले आहेस मी त्या गुरूंना धारण करणार नाही. मी वेगळे गुरू धारण करेन. त्यांच्या गावात एक गुरू आले होते. तिने त्यांना गुरू बनण्यासाठी विनंती केली तेव्हा त्या गुरूंनी म्हटले, पूर्वी सव्वा रुपयांची दक्षिणा असायची परंतु आता महागाई वाढलेली आहे तेव्हा तुला सव्वा दहा रुपये द्यावे लागतील. त्यांनी दक्षिणा घेऊन गुरू बनण्याचा दिवस निश्चित केला.

पप्पूला देखील माहित आहे की मी नेहमी साधे अन्न खातो. जेव्हा मी त्या गावी जात असे तेव्हा ते माझ्यासाठी कोरडी भाकर बनवित असत. त्या सेवकाने आपल्या पत्नीस म्हटले तू हवं तर वेगळे गुरू धारण कर परंतु जर मी आपल्या गुरूंना भोजनासाठी चांगली पक्वान्ने बनवून खाऊ घालत नाही तर तू देखील आपल्या गुरूंना भोजनात पक्वान्ने खाऊ घालू नकोस.

त्या गावात एक नानूनाथ नावाचा इसम होता. त्याने सव्वा दहा रुपयांमध्ये त्यांचा सौदा पक्का केला होता, परंतु हलवा व खीर यांवरून समस्या उत्पन्न झाली. ती म्हणाली,''मला त्यांच्यासाठी हलवा व खीर बनविण्याची समस्या आहे. माझे पती ही गोष्ट कधीही मान्य करणार नाहीत, कारण कधी–कधी जेव्हा त्यांचे गुरू येतात तेव्हा ते त्यांना साधे व कोरडे भोजनच बनवून खाऊ घालतात. त्यांचे गुरू साधे व कोरडे भोजन करून आनंद मानतात व परत जाण्याआधी आमच्या मुलांना दोन रुपये देखील देऊन जातात. तेव्हा तू एकतर पैसे घेऊ नकोस वा हलवा–खीर माफ कर, हेच उत्तम होईल.'' त्या गुरूने म्हटले मी तुझा गुरू बनणार नाही. आता तुम्हीच विचार करून पहा की अशा गुरूंचे व अशा चेल्यांचे काय होईल.

प्रियजनहो, अशा गुरूंनीच गुरुत्व आणि गुरुमतासाठी लोकांच्या मनात घृणता निर्माण केलेली आहे. सर्पदंश झालेला मनुष्य दोरखंडासही घाबरतो. आपण खऱ्या संत–महात्मांपासून फायदा न घेण्याचे हेच कारण आहे. आपले हृदय साशंक व संशयग्रस्त होते की कदाचित हे देखील खोटे गुरू नसावेत.

आगे पाछे गणित न आवे। क्या जाति क्या हुणे हुवे।।

आपण सांगता की आपण हे मोजूदेखील शकत नाही की आपण किती जातींमध्ये जन्मलो व आपणांस या गोष्टीचीही कल्पना नाही की भविष्यात आपण किती जातींमध्ये व किती धर्मांमध्ये जन्म घेत फिरू.

सब कारणा किरत कर लिखिए।
कर कर करता करे करे।।

आपणांस आपल्या पूर्वकर्मांनुसार जे काही प्राप्त होणार आहे परमात्म्याने ते ईश्वरधामातूनच नशीबात लिहून पाठविलेले आहे. वेळ आल्यावर विधी लिखीत घटना घडतात. जे काही होत आहे ते परमात्माच करीत आहे.

मनमुख मरिए गुरुमुख तरिए। नानक नदरि नदर करे।।

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात की हा आमचा व्यक्तिगत अनुभव आहे की मनमुख लोक पुन्हा-पुन्हा जन्मतात व मरतात. गुरुमुखांचा उद्धार होतो. जे गुरुमुखांच्या संगतीत जातात त्यांचादेखील उद्धार होतो. गुरुमुख परमात्म्याच्या आज्ञेवरून या संसारात येतात व परमात्म्याच्या आज्ञेनुसारच कार्य करतात.

मनमुख दूजा भ्रम है दूजे लोभाया।

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात की मनमुख त्यास म्हटले जाते जो परमात्म्यास सोडून संसारिक धन-पदार्थांच्या लोभ-मोहात मग्न असतात. ते या भ्रमात असतात की कदाचित आपले पूर्वज संसारिक धनपदार्थ सोबत घेऊन गेले नाहीत पण आम्ही ते सोबत घेऊन जाऊ. असे व्यक्ती चुकून-माकून गुरुमुखांच्या संगतीत जरी आले तरी तेथेदेखील ते द्वैतभाव व ईर्षेत गुरफटलेले असतात.

कूड़ कपट कमांवदे कूड़ो आलाया।

मनमुख खोटे बोलतात, खोट्याचाच व्यापार करतात आणि खोट्याच्याच आधारे आपले जीवन व्यतीत करतात. त्यांचा मोह सांसारिक मलिन गोष्टींशी असतो. मनमुख भ्रमात येतात, भ्रमातच आपले जीवन व्यतीत करतात व भ्रमातच निघून जातात. भ्रम त्यास म्हणतात ज्यात काही तथ्य नसते आणि तरीही आपण त्यास सत्य मानून बसतो.

ज्याप्रमाणे हा संसार व सांसारिक पदार्थ खरे नाहीत, हा संसार सदैव अस्तित्वात रहाणारा नसून तो नस्वर आहे, परंतु तरीही आपण त्यास छातीशी धरून बसलो आहोत. जेव्हा मृत्यु येतो तेव्हा नेत्र उघडतात की अरेरे, मी आपला मौल्यवान वेळ उगिचच व्यर्थ घालविला.

पुत्र कलत्र मोह हेत है, सब दुख सबाया।।
जम दरि बधे मारिए भ्रमें भरमाया।।

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात की मी आपणांस स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेली गोष्ट सांगतो की मनमुखांना कोणकोणत्या शिक्षा मिळतात. यमदूत त्यांस मारत–झोडत शिक्षा देतात की तुम्ही संसारात जाऊन अत्याचार केलेत. तुम्हांस संसारात शब्दाची पुंजी देऊन पाठविले होते, परंतु तुम्ही तो मार्ग सोडून द्वैत व मी–मोठेपणामध्येच अडकून राहिलात.

आपण पाहतो की येथे पोलिस अपराध्यांना पकडून मारतात. ते सुष्यगात झोपू शकत नाहीत. पोलिस त्याची बिकट परिस्थिती करतात. त्याउलट सभ्य माणसास पोलिस काही करीत नाही. याचप्रमाणे परमेश्वराने यमदूतांचे स्वत:चे सरकार बनविलेले आहे. धर्मराजास कर्मांचा हिशोब ठेवण्यासाठी हिशोबनिस नेमलेले आहे की प्रत्येकाच्या कर्मांचा हिशोब ठेव. कोणताही आत्मा त्याच्या हिशोबाविरुद्ध ना संसारात येऊ शकतो ना संसारातून जाऊ शकतो. प्रत्येकास सविस्तर समजावले जाते की प्रिय मित्रा, ही तुझी स्वत:चीच कर्मं आहेत. त्यावेळी जीव त्यांच्या तावडीत पकडला गेलेला असतो, तो त्यावेळी नाकारू शकत नाही.

मनमुख जन्म गँवाया नानक हर भाया।

गुरू नानकदेवजींनी या वाणीत सविस्तर समजावले की परमात्मा सर्वांना नामाची पुंजी देऊन पाठवितो व त्याची आज्ञादेखील सोबत असते. जे आज्ञेचे पालन करतात त्यांना तो शाबासकी देऊन आपल्या घरी जागा देतो. मनमुख आपला जन्म व्यर्थ गमावून निघून जातो, त्यास शाबासकी कशी मिळेल? परमात्म्याने मनमुखास कितीही दिले तरी ते भूकेलेलेच राहतात.

आपणही गुरू नानकदेवजींनी सांगितल्याप्रमाणे शब्द–नामाची कमाई करावयास हवी. तो परमात्मा गुरुदेव आपणांस नेण्यासाठी येतील तेव्हा आपणांस लज्जित व्हावे लागू नये, आपणांस थांबावे लागू नये. आपण आनंदाने अगोदरच तयार राहिले पाहिजे.

***



निंदक

परमसंत कृपाल सिंहजी महाराजांद्वारे संगतसाठी एक खास संदेश

शक्य असल्यास तुम्ही आपल्या निंदकांवर प्रेम करा. त्याच्या दाराजवळ झोपडी बनवून रहा. निंदक प्रेमभावाने आपणांस आपले अवगुण सांगत राहिल ज्यायोगे आपण सत्कर्म करू शकू. महात्मा चरणदासांचे वाक्य आहे:

निन्दक नेड़े राखिए आँगन कुटी छुहाऐ।

माझे परमप्रिय महाराज कृपाल नेहमी सांगत असत,''आपली मित्र–मंडळी केवळ आपल्या अंतिम यात्रेच्या वेळी आपली तिरडी उचलण्यासाठीच पोहचतात, परंतु निंदक आयुष्यभर आपली सोबत करतात.'' ज्याप्रमाणे सतगुरु त्यांच्या जीवात्म्यास कधीच विसरत नाहीत त्याचप्रमाणे निंदक एका क्षणासाठीही तुम्हांस विसरण्यास राजी नसतो. तो घरोघरी जाऊन लोकांना सांगतो की याच्यामध्ये हे अवगुण आहेत. ही अतिशय विचार करण्यायोग्य बाब आहे की जीवनात आपण भले कितीही सत्कर्मे करोत, लोकं त्यामध्ये कमतरता शोधू लागतात, ज्यामुळे आपला उत्साह नाहीसा होऊ लागतो.

आपण अनेकदा विचार करतो की आपण करीत असलेल्या कामाची कोणाला कदर नसेल, तर ते काम करून काय उपयोग? त्यामुळे ते काम करणे आपण सोडून देतो. आपण एखादे काम न केल्याने देशाचे जरी नुकसान होत असले तरी आपली निंदा करणारा जीव अतिशय आनंदीत होतो. निंदा करणारा जीव इतका विचित्र असतो की तो स्वत: काहीच करत नाही, परंतु आपली निंदा करून आपणांस देखील ते काम करण्यास रोखतो.

आज आपल्या देशात अशा प्रकारच्या जीव–जंतूंचे प्रमाण वाढत आहे. ही देखील विचित्र बाब आहे की असे जीव प्रत्येक ठिकाणी अग्रस्थानी उभे असलेले आपणांस आढळतात.

कबीर साहेबांच्या जीवनातील एक घटना आहे. एक चोर लपत–लपत कबीर साहेबांच्या घरी आश्रयास आला. कबीर साहेबांनी चोरास परमात्म्याचा सुपुत्र समजून त्यास स्वत:च्या घरामध्ये आश्रय दिला, तसेच त्यास आपली कन्या कमालीसोबत झोपविले. लोकांनी चोराचा पाठलाग केला, परंतु कबीर साहेबांच्या घरी त्यांना चोर सापडला नाही.

सकाळी चोर निघून जाऊ लागला. तेव्हा कबीर साहेब त्यास म्हणाले की माझी कन्या कमाली तुझी झाली आहे. तेव्हा तू तिलादेखील तुझ्यासोबत घेऊन जा. चोराने त्यांच्या आदेशाचे पालन केले व तो सज्जन झाला. चोरावर कबीर साहेबांच्या भलेपणा व सत्यवचनांचा खूप प्रभाव पडला आणि चोर सज्जन बनला. कबीर साहेबांच्या निर्णयाने लोकं खूप अस्वस्थ झाली. त्यांनी कबीर साहेबांची खूप निंदा केली. कबीर सोहब त्या लोकांना म्हणाले, ''तुम्हां लोकांना मी केलेली कृती आवडली नसेल, तर तुम्ही तसे करू नका. परंतु तुम्ही मला तसे करण्यापासून परावृत्त कसे करू शकता?''

कबीर साहेब भारतीय लोकांच्या कुकृत्यावर बेधडकपणे टीका करीत असत. त्यांनी त्यांच्या वाणींमध्ये लोकांनी चांगले जीवन कसे जगावे या विषयावर खूप काही लिहिले आहे. कबीर साहेबांचे हे मोठेपण होते की ते त्यांच्या निंदकांचीही प्रशंसा करीत असत. निंदकांबद्दलची त्यांची वाणी आपल्या ग्रंथ–साहित्यामध्ये खूप प्रसिद्ध आहे आणि ती वाणी गुरु ग्रंथ–साहेबमध्ये देखील समाविष्ट केलेली आहे:

निन्दो निन्दो मोको लोक निन्दो।
निन्दा जन की खरी प्यारी निन्दा बाप निन्दा महतारी।
निन्दा होय तो बैकुंठ जाईए, नाम पदार्थ मने वसाईऐ।
हृदय शुद्ध जो निन्दा होय, हमरे कपड़े निन्दक धोऐ।।

निंदक आपल्या कपड्यांचा मळ स्वच्छ करतो आणि हा विचार किती सुंदर भावना आहे? परंतु आपण आपली निंदा ऐकल्यावर आपले मन सैरभैर

होते व आपले मानसिक संतुलन आपण गमावून बसतो. याचे कारण असे आहे की, आपण जे काही काम करीत आहोत, त्या कामाची लोकांनी प्रशंसा करावी, त्या कामाद्वारे आपणांस चांगल्या फळाची प्राप्ती व्हावी आणि लोकांनी आपली वाहवा देखील करावी अशी आपली अपेक्षा असते, परंतु तसे होणे अतिशय अवघड आहे. हेच खरेतर आपल्या निराशेचे कारण आहे.

आपण विसरतो की गीतेत भगवान कृष्णाने अर्जुनास सांगितले होते, ''अर्जुना! सत्कर्म करणे हे तुझे कर्तव्य आहे. तू तुझ्या कर्माच्या फळाची अपेक्षा ठेवू नकोस.'' भगवान कृष्णाचा उपदेश आहे की साधना हीच सिद्धी असावयास हवी. एका साधकास त्याच्या साधनेमध्ये इतके एकरंग व्हावयास हवे की त्यास इतर कोणत्याही सिद्धीची आशा राहू नये.

ही किती महान आणि विलक्षण गोष्ट आहे की सत्कर्मांच्या या साधनेमध्ये निंदक आपला विरोधक नसून तो आपला शुभचिंतकच आहे. कारण आपली निंदा करून तो आपणांस जागृत करीत आहे की आपण करीत असलेले काम बरोबर नाही. निंदक आपले लक्ष आपल्या कमतरतांकडे आकृष्ट करतो. म्हणूनच आपण आपल्या कमतरता दूर करून चांगल्या पद्धतीने आपले काम करू शकतो. कबीर साहेबांनी सांगितले होते:

निन्दा करे सो हमरा मीत निन्दक माहे हमारा चीत।
निन्दक सो जो निन्दा होरे हमरा जीवन निन्दक मोरे।
निन्दा हमरी प्रेम प्यार निन्दा हमरी करे उद्धार।।

निंदक आपला मित्र असून तो आपल्या जीवनाचे कल्याण करीत असतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''दोनच माणसे आपणांस आपले अवगुण सांगू शकतात, निंदक किंवा सतगुरु. निंदक आपल्या तोंडावर आपले अवगुण सांगतो. आपल्यामध्ये ते अवगुण असल्यास आपण ते अवगुण त्यागुन स्वत:चा सुधार घडवावयास हवा.''



संत आपले अवगुण आपणांस गोष्टी रूपात सांगतात की सद्गुणी बनण्यासाठी आपणांस अमुक-अमुक गोष्टींची गरज आहे.आपण सद्गुणी कसे बनावे हे सतगुरु आपणांस सांगतात. आपण जर त्या गोष्टींचा बारकाईने विचार केला, तर आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक वाद-विवाद मिटतील आणि आपण आपल्या विरोधकांच्या अनेक गोष्टी सहन करण्यायोग्य सहनशील बनू शकतो. त्यामुळे आपल्या देशातील नागरिकांचे जीवनमान आरामदायक व स्नेहशील बनू शकते. आपल्या बऱ्याच वाद-विवादांचे कारण हेच आहे की आपण इतर कोणाचेही सांगणे ऐकण्यास राजी नसतो. मग भले ते सांगणे आपल्या हिताचेच का असेनात! आपण अनेक क्षुल्लक-क्षुल्लक गोष्टींवरून इतरांचा रक्तपात करतो. क्वचितच इतर कोणत्या देशामध्ये असे घडत असेल!

निंदकाच्या प्रशंसेवर कबीर साहेबांनी लिहिलेली ही वाणी वाचून अनेक लोक आश्चर्याने म्हणतात की कबीर साहेबांना हे काय सुचले की त्यांनी निंदकांची एवढी प्रशंसा केली? मी हसत-हसत सांगतो की कबीर साहेबांनी निंदकांची प्रशंसा करूनही असे म्हटले नाही की निंदक या संसाररूपी भवसागरातून तरून जातील. या संबंधात कबीर साहेबांच्या वाणीमधील या ओळी खूप छान आहेत:

जन कबीर को निन्दा सार, निन्दक डूबा हम उतरे पार।

या वाईट सवयीचा आपण त्याग करावयास हवा. महाराज सावन सिंहजींचे हे उद्गार आहेत, ''निंदा ना कडू ना मधुर, ना चवदार आहे, तरीही ती मनुष्यास चिकटलेली आहे.''

***

प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – २५ फेब्रुवारी १९९०

एक प्रेमी: *प्रिय महाराजजी! मी तुमचा तो लेख वाचला आहे ज्यात आपण काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार या पाच डाकूंविषयी सांगितले आहे. तो लेख वाचल्यानंतर मला खूप पश्चाताप झाला. त्यातील काही पैलूंविषयी मी समजून घेऊ इच्छितो की जेव्हा मी येथून माझ्या घरी जाईन, तेव्हा काम व क्रोध माझ्यावर हल्ला करतील. त्यावेळी जर मी तुमच्या सुमधुर आठवणीत राहून काम व क्रोध यांना एका बाजूस सारण्याचा प्रयत्न केला तर मी माझ्या प्रेमाची रस्सी तुमच्या गळ्यात घालून, तुम्हांवर माझे ओझे लादल्याप्रमाणे होणार नाही का?*

बाबाजी: तुम्ही प्रश्नोत्तराच्या त्या लेखावर वाचून गहनतेने विचार केलात हे पाहून मला आनंद होत आहे. मी संतवाणी मासिक नियमितपणे वाचण्याचा सल्ला देत असतो. या मासिकात प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे छापली जातात, जी प्रत्येकासाठी फायद्याची असतात. ती वाचल्याने आपला खूप फायदा होतो.

सर्वप्रथम सर्व सत्संगी व्यक्तींनी या पाच डाकूंबद्दल आपल्या मनास ठामपणे बजावयास हवे की काम–अग्नी आपली बेइज्जती होण्यास कारणीभूत ठरतो, तो मनुष्यास जनावर बनवतो; कामी मनुष्यास शेजारी उभा असलेला मनुष्यही दिसत नाही की मला कोणीतरी पहात आहे. काम भोग आपणांस नरकात घेऊन जातात.

कामी मनुष्य शब्द–नामाची कमाई करू शकत नाही, भले त्याने ध्यान–अभ्यासात दुप्पट वेळ दिला तरी त्यास शब्द–नामात रसच येत नाही. काम हा असा अग्नी आहे की ज्यावर जितकी लाकडे टाकू तेवढा तो जास्तच प्रज्वलीत होतो. आपण आपल्या मनास कामामुळे होत असलेले नुकसान वारंवार सांगत राहवयास हवे.

आपणांस मनाशी संघर्ष करणे गरजेचे आहे. त्या संघर्षासाठी सतगुरुंनी आपणांस शब्द–धुन रूपी शस्त्रांनी सज्ज केले आहे. आपणांस कधीही पाच पवित्र नामांचा विसर पडता कामा नये, त्यांचे वारंवार स्मरण करणे गरजेचे आहे. नामस्मरणामुळे आपणांस मदत मिळते. आपले मन जेव्हा आपल्या अंतरात वाईट विचारांची निर्मिती करते, तेव्हा त्या विचारांकडे दुर्लक्ष करून सतगुरू व त्यांनी दिलेल्या पाच पवित्र नामांकडे लक्ष दिल्यास आपणांस नक्कीच मदत मिळते.

आपण सर्व जाणतो की जेव्हा सैनिक लढण्यासाठी रणांगणात गेला असता, अनेकदा शत्रूचे पारडे भारी होते. परंतु त्यावेळी जर सैनिकाने शत्रूसमोर आपली शस्त्र टाकली, तर तो लढाईत यशस्वी होईल का? जर सैनिक भ्याड बनून रणांगण सोडून पळू लागला, तर तो आपल्या मालकाशी एकनिष्ठ आहे असे म्हटले जाईल का? याचप्रमाणे सत्संगीचे देखील कर्तव्य आहे की त्याने एका शूर सैनिकाप्रमाणे नामस्मरणाच्या मदतीने दृढनिश्चयी बनून स्वत:च्या मनाविरुद्ध लढा दिला पाहिजे, कधीच हार मानू नये. खरंतर मनाने आपल्यावर हल्ला करण्यापूर्वीच आपण मनावर नामस्मरणाचा वार करावयास हवा.

जेव्हा काम आपल्यावर हल्ला करते तेव्हा आधी आपल्या अंतरात कामुक विचार घोंगवू लागतात. त्यावेळी जर त्या विचारांना आपण अंतरात स्थान दिले, तर मन आपल्यावर आणखी हल्ला करते. मग आपण शरीराच्या मदतीने काम–वासनेची भूक भागवितो. काम–वासनेच्या आहारी जाऊन आपण अध्यात्मात कंगाल बनतो व आपली उन्नती होऊ शकत नाही. काम आपणांस इतक्या खोल खड्ड्यात ढकलून देते की जिथून आपण बाहेर पडूच शकत नाही. कामाची दुर्गंधी एवढी आपल्या बुद्धीमध्ये संक्रमण करते की आयुष्यभर ती बुद्धीमधून निघत नाही. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

हे कामी नर्क बिसरामी बोह जूनी भरमावनेया।

आपण सांगत आहात,''हे काम–अग्नी! तू आम्हांस निरनिराळ्या योनींमध्ये नेतोस व आमच्या जप–तपाचे हरण करतोस.'' गुरू अर्जुनदेवजी महाराज आम्हांस सावध करताना सांगतात:

निमख स्वाद कारन कोटि दिनस दुख पावे।
घड़ी मोहित रंग माणें रलिया बोहर–बोहर पछतावे।।

आपण आपल्या मनाची समजूत घालावयास हवी की स्वल्प सुखासाठी तुला करोड दिवस दु:ख सहन करावे लागेल. करोड दिवस म्हणजे तेहतीस हजार वर्षे. इतक्या अफाट नुकसानाविषयी जर आपण मनास सांगितले, तर मन नक्कीच तसे करण्याचे टाळेल व कानाला खडा लावेल.

कबीर साहेब सांगतात,''मी माझ्या सतगुरूंसमोर हात पसरून साद घातली की मला वाचवा, हे शत्रू मला घेराव घालत आहेत. तेव्हा सतगुरूंनी माझे रक्षण केले.'' अशाच पद्धतीने जर आपणही शुद्ध अंत:करणाने आपल्या सतगुरूंसमोर विनंती केली, तर मग कितीही बिकट मार्ग असला तरी सतगुरू आपल्या मदतीसाठी नक्कीच पोहचतात. खरेतर आपण अंतरात नको त्या विचारांना स्थान देलेले असते आणि वरून आपण नामस्मरणाचे ढोंग करून बसलेलो असतो. आपण जर अंतरातून तसेच बाहेरून सच्चे व शुद्ध बनलो तर आपण घातलेली साद नक्कीच ऐकली जाते.

आपण सतगुरूंना सांसारिक गोष्टींविषयी पत्र लिहितो किंवा दर्शनासाठी भेटलो असता त्यांच्याशी सांसारिक विषयांवर चर्चा करतो ज्यागोष्टींचा सतगुरूंवर भार पडतो. संतांना आपल्या सांसारिक जीवनाशी काही घेणे–देणे नसते. संत आपणांस सत्संगातदेखील हेच समजावतात की आपण आपल्या जीवनातील कार्ये जेवढ्या शांत मनाने आणि विवेकबुद्धीचा वापर करून करू, तेवढे आपले जीवन आपण शांतपणाने जगू व सोबत जास्तीत–जास्त नामस्मरणदेखील करू शकू.

जे शिष्य या डाकूंपासून स्वत:चा बचाव व्हावा म्हणून प्रार्थना करतात, ते अतिशय भाग्यशाली आहेत. संतांची इच्छा असते की आपल्या मुलांचा या

डाकूंपासून बचाव व्हावा. सतगुरू एखाद्या धोब्याप्रमाणे काम करीत असतात. ते एखाद्या अत्यंत मलिन आत्म्यासदेखील मदत करण्यासाठी तयार असतात.

आपले जीवन प्रेममय बनवून जीवनाचा स्वर्ग बनविणे ही पती–पत्नीची जबाबदारी असते. कधी पत्नी आपल्या पतीचे, तर कधी पती आपल्या पत्नीचे अवगुण पत्रात लिहून मला पाठवितात. तुम्ही विचार करा, अशी पत्रे जेव्हा संत वाचतात, तेव्हा त्यांच्या हृदयाची काय अवस्था होत असेल? खरे तर या पती–पत्नीच्या आपआपसातील अडचणी असतात, ज्यांचे निराकरण त्यांनीच घरी एकत्र बसून करावयास हवे. संत कोणत्याही पती–पत्नीस एकमेकांपासून दुरावण्याचा सल्ला कधीही देत नाहीत. तसे करण्याचा विचारही ते करू शकत नाहीत. इतके माहित असूनही आपण संतांशी अतिशय विचित्र व निरर्थक गोष्टींवर चर्चा करतो ज्यांचा अध्यात्माशी काहीच संबंध नसतो. मी याविषयी सांगू लागलो तर एक ग्रंथच बनेल.

जो जीव स्वत:चा काम, क्रोधापासून बचाव व्हावा म्हणून सतगुरूंच्या चरणी प्रार्थना करतो, अशा जीवास मदत करताना सतगुरूंना अतिशय आनंद होतो. या पाच डाकूंपासून आपला बचाव करण्यासाठीच सतगुरू या जगात येतात. जो खऱ्या अंत:करणापासून यांच्याशी झुंज देतो, सतगुरू त्यास नक्कीच मदत करतात. गुरू गोविंद सिंहजी सांगतात:

सवा लाख से एक लड़ाऊ तभी गोबिंद सिंह नाम कहाऊ।

आपल्या धर्मग्रंथांमध्ये नोंद आहे की आपल्या एका इंद्रियाचे बळ दहा हजार हत्तींसमान आहे. इंद्रियांवर ताबा मिळविणे आपल्या मावशीच्या घरी जाण्याइतके सोपे नाही. एकट्या मनाचे बळ पंचविस हजार हत्तींच्या बळासमान असल्याची नोंद आहे. अशी ही सव्वा लाख हत्तींची एक प्रचंड बळाची सेना आहे. केवळ एका हत्तीवर नियंत्रक करणे हे देखील मनुष्यास अवघड जाते. या सर्वांशी आपली लढाई करविण्यासाठीच सतगुरू या जगात येतात. गुरू गोबिंद सिंहजी महाराज सांगतात:

चिड़ियों से मैं बाज लड़ाऊ तभी गोबिंद सिंह नाम कहाऊ।

आपण सांगता, आपला आत्मा चिमणी आहे व आपले मन बहिरी ससाणा आहे. मी या बहिरी ससाणारुपी मनास चिमणीरुपी आत्म्याच्या हातून पराभूत करून त्यावर आत्म्याचा ताबा मिळवून देईन तेव्हाच मी स्वत:स गुरू म्हणवून घेईन.

माझे सतगुरू, सकल विश्वाचे मालक, महाराज कृपाल जेव्हा मला ध्यान–अभ्यासासाठी गुहेत बसवू लागले, तेव्हा माझ्या नेत्रांवर हात ठेवीत ते म्हणाले, ''हे बघ! नेत्र अंतर्यामधून उघडायचे असून बाह्य नेत्र बंद करायचे आहेत.'' त्यावेळी मी एखाद्या अनाथ बालकाप्रमाणे रडलो. माझ्या बाह्य नेत्रांमधूनच नव्हे तर आंतरिक नेत्रांमधूनही अश्रु वाहू लागले. आंतरिक नेत्रांमधून वाहणारे अश्रु माझ्या बाह्य नेत्रांमधून वाहणाऱ्या अश्रुंपेक्षा अधिक मौल्यवान होते. मी म्हणालो, ''माझ्या लज्जेचे रक्षण तुम्हीच करायचे आहे. हे साम्राज्य काळाचे असून तो माझ्या मागे लागला आहे. तेव्हा आता माझी लज्जा तुमच्याच हातामध्ये आहे.''

माझ्या सतगुरूंच्या कृपेमुळेच माझे रक्षण झाले. बालपणापासूनच त्यांची कृपा मला लाभत होती. परमात्म्यास ज्याचे रक्षण करावयाचे असते त्यांच्या विचारांमध्ये बालपणापासूनच प्रभूप्रेम जागृत झालेले असते आणि प्रभू त्यांचे वाईट प्रवृत्तींपासून रक्षणही करतो.

बाबा बिशनदासजींकडून मला दोन–शब्दांचे नाम प्राप्त झाले होते. त्यांनी माझ्या अध्यात्मिक जीवनाचा पाया मजबूत बनविला. त्यावेळी मी तारुण्यावस्थेमध्ये होतो. ते मला म्हणाले, ''हे बघ मुला! तू जर काही दुष्कर्म केलेस, मद्यपान केलेस वा विषय–भोगांमध्ये अडकलास तर लोकं मला नाव ठेवतील. ते म्हणतील हा अमुक गुरूचा चेला आहे. हे मी सहन करू शकणार नाही व कदाचित त्यावेळी मी आत्महत्या करीन! आता तू विचारपूर्वक तुझे जीवन व्यतीत कर. ज्याप्रमाणे सेवकाची लज्जा सतगुरूंच्या

हातामध्ये असते, त्याचप्रमाणे सतगुरूंची लज्जादेखील सेवकाच्या हातामध्ये असते.'' बाबा बिशनदासजींनी माझ्या व्यतिरिक्त इतर कोणालाही नाम दिले नव्हते. ते अतिशय कठोर स्वभावाचे महात्मा होते. मी खूप निरनिराळ्या ऊंच-सखल ठिकाणी गेलो परंतु त्यांचे हे वचन पक्के लक्षात ठेवले.

परमात्म्याच्या शोधासाठी जेव्हा घरातून बाहेर पडत होतो, तेव्हा माझी आई मला म्हणाली,''हे बघ मुला! कोणी दिलेले कपडे वापरू नकोस. कोणाकडून मागून अन्न ग्रहण करू नकोस. यामुळे आमची लाज जाईल. तुझ्याकडील पैसे जेव्हा संपतील, तेव्हा तू घरी येऊन सहज पैसे घेऊन जाऊ शकतोस. आम्ही तुला कधीच अडवणार नाही. आम्हांस तुझ्या प्रभू प्रेमाची आणि भक्तीची जाणीव आहे.''

आजदेखील एखाद्या गोष्टीसाठी जर मला कोणी आग्रह करीत असेल, तर मी त्यास माझ्या आईचे वचन सांगतो. माझ्या आईने हे देखील सांगितले होते की जर कोणी विवश केलेच तर त्याचे अंत:करण दुखवू नकोस, त्याची कोणत्या ना कोणत्या स्वरूपात परतफेड कर. मी अनेक ठिकाणी गेलो परंतु मी माझ्या आईच्या तसेच बाबा बिशनदासजींच्या वचनांचे पालन केले.

प्रियजनहो! शिष्याकडे पाहून त्याच्या गुरूंबद्दल अंदाज येतो. गुरूंचे शिष्य जेवढे सदाचारी असतील, तेवढा अधिक गुरूंना मान-सन्मान प्राप्त होतो. जेवढ्या जास्तीत-जास्त शिष्यांना गुरू परमात्म्याच्या दरबारात नेतील, तेवढेच अधिक ते स्वत:स भाग्यशाली समजतील.

बाबा बिशनदासजींनी मला सांगितले होते की,''नेहमी शेती करून तू स्वत:चा उदरनिर्वाह कर. आळशी बनू नकोस.'' मी पंजाब सोडून येथे राजस्थानमध्ये आलो आणि येथे जमीन विकत घेतली. त्यावेळी या विभागास बिकानेरचा प्रांत असे संबोधिले जाई. येथे नेहमीच मी स्वमेहनत करून आपला निर्वाह केला व स्वमेहनतीने शेतकाम करण्यामध्ये मी कधीही लाज बाळगली नाही व जोपर्यंत मी राहीन तोपेर्यंत स्वमेहनत करीत राहीन.

प्रियजनहो! आपण आपल्या मनास क्रोधामुळे होणाऱ्या नुकसानीबद्दल नेहमी जाणीव करून द्यावयास हवी. क्रोध अतिशय वाईट अग्नी आहे. ज्यांच्या अंतरात क्रोधाग्नी प्रज्वलित होतो, तो अग्नी त्यांच्या सर्व सदगुणांना भस्मसात करून टाकतो. लोभी मनुष्यास ना स्वत:च्या मुलावर ना स्वत:च्या मुलीवर प्रेम असते. तो स्वत:ची लोभरूपी तृष्णेचे शमन करण्यामध्ये मग्न असतो. लोभी मनुष्य परमात्म्याची भक्ती करू शकत नाही. हीच अवस्था मोहाची आहे. तोच आपणांस वारंवार या जगामध्ये ओढून आणत असतो. मोह आपला कट्टर शत्रू आहे. हीच परिस्थिती अहंकाराची आहे. अहंकार दीर्घायुषी असतो. सर्व इंद्रियांचे दमन झाल्यानंतरच तो स्वत:ची हार मानतो.

आपण आपल्या मनास काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार या पाच डाकूंपासून होणाऱ्या नुकसानाची जाणीव करून देणे जरूरी आहे. संतांनी त्यांच्यापासून बचाव व्हावा म्हणून त्यावर शब्द–नामाची कमाई हे औषध सांगितले आहे. शब्द–नामाची कमाई करूनच आपला चिमणीसारखा दुर्बळ आत्मा या पाच डाकूंशी झुंज देण्यासाठी एखाद्या बहिरी ससाण्याप्रमाणे शक्तीशाली बनतो.

महाराज सावन सिंहजी आम्हां सांसारिक लोकांच्या दुर्दशेचे वर्णन करीत असत की,''आपण विष प्राशन करतो सोबत होणाऱ्या वेदनांनी हाय–हाय देखील करीत राहतो.'' कबीर साहेब सांगतात की,''जेव्हा एखादा मनुष्य हातामध्ये दिवा असूनही स्वत:च विहिरीत पडला, तर त्यास कोण वाचवू शकेल?'' म्हणून आपण सतगुरूंनी दर्शविलेल्या मार्गावर इनामदारीने वाटचाल करावयास हवी. आपण जर इनामदारीने ध्यान–अभ्यास व नामस्मरण केले तर सतगुरु त्यांची जबाबदारी नक्कीच पूर्ण करतात ते कधीच स्वत:च्या जबाबदारीपासून मागे सरत नाहीत.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
दिल्ली शहरातील सत्संगाच्या कार्यक्रमाची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने दिल्ली शहरात दरवर्षीप्रमाणे त्यांच्या मधुर आठवणीत सत्संगाचा कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित केला जात आहे. सर्व बंधू–भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा. कार्यक्रमात जाण्याचा उद्देश लक्षात ठेऊन तेथील वेळापत्रकाचे पालन करावे ही नम्र विनंती.

२० ते २२ मे २०१६

कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार,
(पीरागढ़ी चौक जवळ) नवी दिल्ली ११० ०८७
राकेश शर्मा – ९८१०२१२१३८, सोनू ९८१०७९४५९७ सुरेश चोपडा ९८१८२०१९९९

***